।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: exam.sci.os@gmail.com**


संदर्भ :परीक्षा/२०२०—२१/363 दिनांक : २३/०९/२०२०

प्रति,

मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय,

मा.संचालक, सर्व संकुल विद्यापीठ परिसर,

उपकेंद्र लातूर, परभणी,

न्यु मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली,

प्रस्तूत विद्यापीठ

**विषय:—** कोविड १९ साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्ष/अंतिम सत्र(व्यावसायिक/अव्यावसायिक) परीक्षा देणा—या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविणेबाबत..

**संदर्भ:**—१) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण—२०१६/प्र.क्र. ३०२/विशि—३ दिनांक ४ मार्च, २०१७

२) युएनआय/२०२०/बैठक/विशि—१/भाग—२/६०१७ दिनांक १७ सप्टें. २०२०

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी २०२० परीक्षेसाठी आपल्या परीक्षा केंद्रावर दिव्यांग विद्यार्थी उपस्थित झाल्यास त्यांना परीक्षेसाठी आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत संदर्भ क्र. १व २ अन्वये महाराष्ट्र शासनाने कळविलेले आहे. त्यानूसार योग्य ती पुढील कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

सोबत महाराष्ट्र शासनाचे मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्राची प्रत जोडली आहे.

आपला,

संचालक,

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:

मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे—१

मा. शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण नांदेड.

कुलसचिवांचे कार्यालय
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
आवक क्र. 2640
दिनांक 22/09/2020

महाराष्ट्र शासन

# कार्यालय, विभागीय शिक्षण सहसंचालक,

(उच्च शिक्षण ), नांदेड विभाग,नांदेड

शासकीय तंत्र निकेतन परीसर, नांदेड – 431602

दुरध्वनी / फॅक्स क्र. 02462-283144

ई-मेल :- jdhe.nanded@yahoo.co.in

जा.क्र.विशिससं/उशि/नांवि/अनु-2/कोरोना/2020-21/ 3341

दिनांक :- 21 / 09 /2020.

प्रति,
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

Examinations
S. R. T. M. University
Inword No. 821
Date 23/09/20

विषय :- कोविड 19 साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्ष / अंतिम सत्र (व्यावसायिक / अव्यावसायिक ) परीक्षा देणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविणेबाबत.

संदर्भ :- 01. मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/2020/बैठक/विशि-1/भाग-2/6017 दिनांक 17/09/2020

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सर्व अकृषी विद्यापीठांच्या मा. कुलगुरुंची आभासी बैठक शासन स्तरावरुन दिनांक 16 सप्टेंबर, 2020 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर प्रतिनिधींनी कोविड-19 आजाराच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष / अंतिम सत्र परीक्षेसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हित विचारात घेऊन आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी केली आहे. या अनुषंगाने झालेल्या चर्चेनुसार यासोबत जोडण्यात आलेल्या संदर्भिय पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचनेनुसार आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्या बाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे

(डॉ. नलिनी खे. टेंभेकर)
सहसंचालक
उच्च शिक्षण, नांदेड विभाग,
नांदेड.

प्रतिलिपी माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :

शिक्षण संचालक उच्च शिक्षण [illegible]

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्रमांक- युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/भाग-२ /६०७७ दिनांक- 17 SEP 2020

प्रति,

१.मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२.मा.कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक नागपूर
३.मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
४.मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड.
५.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय कोविड १९ साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्ष/अंतिम सत्र (व्यावसायिक/अव्यावसायिक) परीक्षा देणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविणेबाबत.**

संदर्भ शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/ विशि-३ दिनांक ४ मार्च, २०१७

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंची आभासी बैठक शासन स्तरावरुन दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी घेण्यात आली. सदर बैठकीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर प्रतिनिधीनी कोविड-१९ आजाराच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष/अंतिम सत्र परीक्षांसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हित विचारात घेऊन आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी केली आहे. त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व उच्च शिक्षण देणा-या संस्थांमध्ये विशेष गरजा असणा-या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे मूल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक असून त्यांना गरजेनुसार सोयी सवलती देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन धोरण निश्चिती करण्यात आलेली आहे. सदर धोरणानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात येणा-या अडचणी व परीक्षा पध्दतीमध्ये आवश्यक असलेल्या सोयी सुविधाबाबत शासन निर्णय दिनांक ०४ मार्च, २०१७ अन्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून त्याप्रमाणे सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यकतेप्रमाणे सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात.

२. अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या(पदवी/पदव्युत्तर/व्यावसायिक/अव्यावसायिक) परीक्षांच्या नियोजनाबाबत गठीत करण्यात आलेल्या डॉ.पेडणेकर समितीने दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजी शासनास सादर केलेला असून सदरचा अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे, व तसे सर्व अकृषी विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे.

कार्यालय
विभागीय शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड
आवक क्रमांक 954
दिनांक 21.9.2020
विभाग

या अहवालामध्ये देखील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधांसह त्यांना सोयीच्या पद्धतील अशा पध्दतीने परीक्षांचे नियोजन करावे, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे अशी शिफारस केली असून त्याचे कसोशीने पालन करावे.

३. एकही विद्यार्थी सोयीसुविधा तसेच परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४. दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षाबाबत येणा-या अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर एक नोडल अधिका-याची नेमणूक करण्यात येऊन त्यांची नांवे व फोन क्रमांक / हेल्पलाईन क्रमांक विद्यापीठ तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

५. सदर सूचना आपल्या अधिनस्थ सर्व महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांचे निदर्शनास आणाव्यात.

६. तसेच देण्यात येणा-या सोयीसुविधाबाबत सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना येत्या २१ तारखेपर्यंत अवगत करावे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर-

१. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. स्वीय सहाय्यक, मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३३
३. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
४. संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई.
५. संचालक, कला शिक्षण, मुंबई.